देवगड पो. ठाणे
दि. ०७/०४/२०२३

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** देवगड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/04/2023 09:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 06/04/2023
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/04/2023
**Time From (वेळेपासून):** 19:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/04/2023 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/04/2023 08:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महावितरण शाखा कार्यालय वाडा ,देवगड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रसन्न प्रभाकर गोगटे 8308550202

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जामसंडे ,देवगड ,देवगड,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जामसंडे ,देवगड ,देवगड,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8308550202

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमित आप्पासाहेब पाटील | | | 1. बगला नं 2,आर के नगर , ओमसाई गणेश कॉलनी, आपटेमळा पाचगांव ,करवीर , करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. दराच्या 60 चलनी नोटा | 30,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इतर | घरगुती वस्तु | एक जुनी मळकट काळ्या रंगाची फुट पॅन्ट जुनी वापरती | 200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,200.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी प्रसन्न प्रभाकर गोगटे, वय वर्षे- ३३, धंदा- आंबा बागायती, राहणार- जामसंडे, ता.देगवड, जि- सिंधुदुर्ग, मो.क्र. 8308550202 समक्ष लिहून देतो की, माझे राहते घर जामसंडे ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे असून, घरामध्ये मी व माझी पत्नी, मुले तसेच वडील पद्माकर वगैरे माणसं एकत्रात राहतो. माझा व माझे कुटुंबाचा आंबा बागायती व्यवसाय आहे, तो आम्ही एकत्रात करतो. फणसाळ तीठा येथे माझे वडील पद्माकर गोगटे यांचे मालकीची आंबा कलम व इतर वेगवेगळ्या जातीच्या झाडांची बाग आहे. बागेमधील झाडांना रॉकेलवर चालणा-या पंपाच्या सहाय्याने आम्ही पाणी घालतो. परंतु अलिकडे रॉकेल पुरवठा कमी होऊ लागल्याने, आमची गैरसोय होवू लागली. परीणामी आंबा हंगामामध्ये झाडांना पुरेसे पाणी न मिळाल्याने आंब्याची फळे गळून पडू लागली. म्हणून आम्ही फणसाळ तीठा येथील आंबा बागेमध्ये विद्युत कनेक्शन घेण्याचे ठरविले. आंबा बागायतीची जमिन माझे वडील श्री.पद्ममाकर पांडुरंग गोगटे, यांचे नावे असल्याने, वडीलांच्या नावाने विद्युत कनेक्शन मिळणेकरीता त्यांचा विनंती अर्ज तयार केला. तसेच माझे जवळचे मित्र श्री.वाडेकर यांना सुद्धा वाडा सडेवाडी या ठिकाणी विद्युत कनेक्शन आवश्यक असल्याने, त्यांनी ही विद्युत कनेक्शन मिळणेकरीता विनंती अर्ज तयार केला. दोन्ही अर्ज मी स्वतः वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयामध्ये सव्वा वर्षापुर्वी दाखल केला. त्यानंतर विद्युत कनेक्शन बाबत वेळोवेळी वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयामध्ये जावून पाठपुरवठा केला असता, प्रत्येक वेळी वेगळी कारणे सांगण्यात आली. दि.17/2/23 रोजी वाडा विद्युत उरकेंद्र प्रमुख श्री. पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विद्युत कनेक्शन अर्जाबाबत विचारणा केली असता, श्री.पाटील, यांनी तुमची प्रकरणे मंजुरी करीता वरिष्ठ कार्यालयामध्ये पाठविली आहेत. तुमचे काम होवून जाईल, काहीतरी करावे लागेल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना काहीतरी म्हणजे काय ? असे विचारले असता श्री. पाटील साहेबांनी वाडेकरांचे 10000/- रु. व तुमचे 20000/-रु असे मिळून 30000/- रु. द्यावे लागतील. तेव्हा मी त्यांना ठिक आहे असे सांगुन कार्यावयामधून बाहेर निघून आलो. व दि.21/2/2023 रोजी अँन्टी करप्शनच्या विभागाच्या वेबमेलवर माझी तक्रार अपलोड केली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री. कांबळे अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांनी माझेशी संपर्क साधला व माझे तक्रारी बाबत चर्चा केली व दि. 28/02/23 रोजी दुपारी 12.00 वा. माझे वाडा सडावाडी येथील आंबा बागेमध्ये प्रत्यक्ष भेटण्याचे ठरले. चर्चे दरम्यान ठरल्याप्रमाणे दि.28/02/23 रोजी उपअधिक्षक श्री. कांबळे आपल्या कार्यालयीन स्टाफ व पंच साक्षीदार यांचेसह वाडा सडेवाडी येथील बागेमध्ये 12.00 वा. पोहचले. पोलीस उपअधिक्षक श्री. कांबळे यांनी पंच साक्षीदार श्री.जगताप व श्री.गवस यांची तसेच पोलीस अंमलदार पोहवा/परब पोकाँ/पोतनिस, व चालक पोना/पेडणेकर यांची मला ओळख करून दिली. त्यानंतर मी सुद्धा त्यांना माझी ओळख सांगितली. पोलीस उपअधिक्षक श्री. कांबळे यांनी मला पंच साक्षीदार यांना तक्रारी बाबत थोडक्यात हकिगत सांगण्यास सांगितली. त्यावरुन पंच साक्षीदार यांना वरील प्रमाणे थोडक्यात तक्रार सांगितली. तेव्हा पोलीस उपअधिक्षक श्री. कांबळे यांनी सदरची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यबाबत मला सुचना दिल्या. त्यावरून मी स्वहस्ताक्षरात तक्रार लिहिली ती पुढीलप्रमाणे-- माझे वडील श्री.पद्माकर पांडुरंग गोगटे यांचे नावे माझा फणसाळ तीठा येथील बागेतील मांगरात विद्युत कनेक्शन मिळणेसाठी तसेच माझा मित्र वाडेकर यांने वाडा सडेवाडी या ठिकाणी विद्युत कनेक्शन मिळणेसाठी वाडा विद्युत उपकेंद्र प्रमुख यांचे नावे विनंती अर्ज दिले होते. दोन्ही अर्ज मी स्वतः वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयात आज सुमारे सव्वा वर्ष होईल तेव्हा दिले होते. त्यानंतर वेळोवेळी याबाबत माहीती घेतली असता, मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयामध्ये प्रकरण पाठविले असल्याचे सांगितले जात होते. माझे बागेतील चालू हंगामाच्या आंब्यांचे नुकसाण होवू लागल्याने दि.17/2/23 रोजी वाडा विद्युत उपकेंद्र प्रमुख श्री.



Scanned with OKEN Scanner

पाटील साहेब यांची त्यांचे कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन आंब्यांच्या होत असलेल्या नुकसानी बाबत कल्पना देवून विद्युत कनेक्शन लवकरात लवकर बसविणेकरीता विनंती केली. तेव्हा श्री. पाटील साहेबांनी तुमची प्रकरणे मंजुरीकरीता वरिष्ठ कार्यालयामध्ये पाठविली आहे. तुमचे काम होवून जाईल. काहीतरी करावे लागेल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना काहीतरी म्हणजे काय ? असे विचारले असता श्री. पाटील साहेबांनी वाडेकरांचे 10000/- रु. व तुमचे 20000/-रु असे मिळून 30000/- रु. द्यावे लागतील. तेव्हा मी त्यांना ठिक आहे असे सांगुन कार्यावयामधून बाहेर निघून आलो. व दि.21/2/2023 रोजी अँन्टी करप्शनच्या विभागाच्या वेबमेलवर माझी तक्रार अपलोड केली. माझी विद्युत कनेक्शन मागणी कायदेशिर असून त्याकरीता आवश्यक असलेले सर्व कागदपत्र प्रकरणामध्ये जोडलेले आहेत. असे असताना वाडा विद्युत उपकेंद्र प्रमुख श्री.पाटील साहेब हे माझ्ये व श्री.वाडेकर यांचे विद्युत कनेक्शन करीता मागत असलेली रक्कम रूपये 30000/- त्यांना द्यावयाची इच्छा नाही. श्री.पाटील साहेब यांचेशी माझी पुर्वील कोणत्याही प्रकारची वाकडीक अथवा आर्थिक देवघेवीचा व्यवहार नाही. तरी श्री.पाटील साहेब वाडा विद्युत केंद्र यांचेविरुध्द आपल्या विभागा मार्फत योग्य ती कारवाई करणेत यावी ही विनंती. सोबत माझे वडील श्री.पद्माकर पांडुरंग गोगटे व मित्र श्री.वाडेकर यांचे विद्युत कनेक्शनची मागणी विनंती अर्जाची छायांकीत प्रत आहे. अशी तक्रार लिहून पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांच्याकडे दिली. पोलीस उपअधिक्षक श्री. कांबळे यांनी माझी स्वहस्ताक्षरातील तक्रार वाचून पंच साक्षीदार यांना वाचण्यासाठी दिली. त्याप्रमाणे पंच साक्षीदार यांनी माझी तक्रार वाचून पाहीली. तेव्हा मी सांगितलेली तोंडी तक्रार व लिहून दिलेली तक्रार यातील मजकूर सारखाच असल्याची पंच साक्षीदार यांची खात्री झाल्याने पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांचे सुचनेवरून पंच साक्षीदार यांनी माझ्या तक्रारीवर स्वाक्ष-या केल्या. त्यांनंतर पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांनी तक्रारीवर सही करून ती तक्रार आपल्या ताब्यात ठेवली. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांनी लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि-सिंधुदुर्ग यांची वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालय येथे लाचेच्या मागणीची पडताळणी कारवाई करणेचे सर्वानुमते निश्चित केले. त्या अनुषंगाने सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करून दि. 28/02/23 रोजी 13.05 ते 13.27 वा.जे मुदतीत लोकसेवक पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग यांची वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयात लाचेची मागणी संदर्भात पडताळणी केली. पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग यांनी माझे वडील श्री.पद्माकर गोगटे व मित्र श्री.वाडेकर यांचे विद्युत कनेक्शन प्रकरणाबाबत चर्चा करून वाडेकर यांचे 10000/- रु. व वडीलांचे 20000/- रु. असे एकूण 30000/- रुपयांची लाचेची मागणी केली. व खड्डे मारायला सुरु केल्यावर फोन करून सांगतो असे सांगितले. तसे माझे व लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांचे झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे. दि. 28/2/2023 रोजीच्या पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर पंचनामा 10.00 ते 15.45 वा.चे मुदतीत पोउप/श्री.कांबळे यांनी पंचांसमक्ष केलेला आहे. त्यानंतर दि.15/03/203 रोजी लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग यांनी मला फोन करून आंब्याची बिटके घेऊन या असे सांगितले असता, त्यांना आमच्या विद्युत कनेक्शन प्रकरणाबाबत विचारणा केली असता, त्यांनी एक दोन दिवसात डिपॉझिट ऑनलाईन भरण्यासंदर्भात तुम्हाला मोबाईलवरून मॅसेज येईल त्याप्रमाणे डिपॉझिट भरा आणि या येताना आंब्याची बिटके घेऊन या असे सांगितले. त्याप्रमाणे दि. 16/03/2023 रोजी माझ्या मोबाईलवर डिपॉझिट भरण्यासंदर्भात मॅसेज आला. त्या अनुषंगाने दि.16/03/23 रोजी मी ऑनलाईन डिपॉझिट भरणाकरून पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांना फोन करून वरील प्रमाणे हकिगत सांगितली. व पुढील कारवाई संदर्भात आम्ही चर्चा केली. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांनी लोकसेवक पाटील हे लाचेच्या रक्कमेची मागणी करण्याची शक्यता असल्याने दि. 17/03/23 रोजी सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दि. 17/03/2023 रोजी सायंकाळी 16.00 वा.चे दरम्याने पोकाँ/पोतनीत यांनी मला फोन करून वाडा सडावाडी येथील आंबा बागेजवळ आलो असल्याचे कळविले असता, मी त्यांना वाडा विद्युत उपकेंद्राच्या मागे वाडे कोनी येथील आंबाबागेमध्ये येण्यास सांगितले. त्यांप्रमाणे पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, पंच साक्षीदार व पोलीस अंमलदार असे शासकिय वाहनाने वाडा उपकेंद्राच्या मागे वाडा कोनी येथील आंबा बागेमध्ये आले. पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे यांनी सापळा पथकामध्ये नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या पंच साक्षीदार श्री. मेहत्तर व पोलीस अंमलदार पोना पालकर यांची मला ओखळ करून दिली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी पुढील कार्यवाही सापळा पुर्व पंचनामाची असलेली सांगून लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांना देण्यासाठी लाच रक्कम हजर करण्यास सांगितली. त्याप्रमाणे माझ्या जवळ असलेली आंबा व्यवसायातील रक्कम रुपये 30000/- पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांचेकडे

हजर केली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी सापळा पूर्व पंचनाम्या दरम्यानची सर्व कायदेशिरबाबींची पुर्तता करून लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांना देण्यासाठी अँन्थ्रासिन पावडर लावून तयार केलेली लाच रक्कम माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यामध्ये ठेवली. व लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग, यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पंच साक्षीदार क्र. 1)श्री.जगताप यांचे समवेत माझे पँशनप्रो दुचाकी वाहन क्र.एम.एच. 07 U 0815 ने वाडा विद्युत उपकेंद्र या ठिकाणी 19.19 वाजता पाठविले. आमचे पाठोपाठ पोउप/श्री. कांबळे पंच क्र. 2) श्री.मेहत्तर पोकाँ/पोतनीस व चापोना/पेडणेकर असे शासकीय वाहनाने वाडा कोनी येथील आंबा बागेमधून निघून वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयाजवळ आले. त्याठिकाणी असलेल्या श्री.फडके यांचे दुकानाजवळ शासकिय वाहन थांबवून वाहनांमधून खाली उतरून रोडने ठराविक अंतराने पायी चालत चालत वाडा विद्युत उपकेंद्र कार्यालयाजवळ कोणास संशय येणार नाही अशा पद्धतीने काळोखामध्ये थांबून राहीलो. लोकसेवक पाटील यांना संशय येऊ नये म्हणून पंच साक्षीदार क्र 1) श्री. जगताप यांना विद्युत उपकेंद्र वाडा कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ रोडवर उरतवून मी मोटार सायकल घेऊन कार्यालयामध्ये गेलो असता. लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, हे हाफ पँन्टमध्ये कार्यालयात बसले होते. त्यांना डिपॉझिट भरले असे सांगून काम सुरू होईल ना असे विचारले असता. श्री.पाटील यांनी हो आता काम सुरु होणार काम झाल्यावर बघूया तो पर्यंत काय नको असे सांगितले. तेव्हा मी त्यांना वाडेकरला सरळ सांगून टाकल की, बाबा तुझे दहा हजार रुपये तुझे होतायत, तेव्हा श्री.पाटील बरोबर असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना माझे वीस हजार माझ्याकडे तयार आहेत असे सांगितल असता, त्यांनी बर बर असे म्हणून मिटर बसल्यावर बघू असे सांगितले. तसे माझे व लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांचे झालेले संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे. दि. 17/03/2023 रोजीच्या सापळा पुर्व व सापळा परतीचा पंचनामाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. दि. 06/04/2023 रोजी सकाळी 08.50 वा. लोकसेवक श्री.पाटील यांनी मला फोन करून खड्डे मारायला चालू केले. लवकर तुमचे काम होईल असे सांगून संध्याकाळी भेटण्यास या असे सांगितले. पोउप/श्री. कांबळे, यांना मी सदरची हकिगत सांगितली असता, पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी लोकसेवक पाटील हे लाचेच्या रक्कमेची मागणी करण्याची शक्यता असल्याने त्यांचे विरुद्ध दि. 06/04/2023 रोजी सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दि. 06/04/2023 रोजी सायंकाळी 16.42 वा.चे दरम्याने पोकाँ/पोतनीस यांनी मला फोन करून वाडा कोनी येथील आंबा बागेत आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी मी वाडा येथील आंब्याच्या बागेत असून मी येईपर्यंत फार्महाऊसच्यावरच्या खोलीत थांबून राहण्यास सांगितले. पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी सापळा पथकामध्ये नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या. पोहवा/रेवंडकर यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी पुढील कार्यवाही सापळा पुर्व व पंचनाम्याची असल्याचे सांगून लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांना देण्यासाठी लाच रक्कम हजर करणेस सांगितली. त्याप्रमाणे माझ्याजवळ असलेली आंबा व्यवसायातील रक्कम रू. 30000/- व पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांचेकडे हजर केली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी सापळा पूर्व पंचनाम्या दरम्यानची सर्व कायदेशिरबाबींची पुर्तता करून लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांना देण्यासाठी अँन्थ्रासिन पावडर लावून तयार केलेली लाच रक्कम पोना/पालकर यांनी माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यामध्ये ठेवली. व लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग, यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पंच 1) श्री. जगताप व पोकाँ/ पोतनीस यांचे समवेत माझे अल्टो वाहन क्र. एम.एच. 07 एच. 0815 ने वाडा विद्युत उपकेंद्र या ठिकाणी 19.35 वाजता पाठविले. आमच्या पाठोपाठ पोउप/श्री.कांबळे, पंच क्र. 2) श्री. मेहत्तर पोहवा/रेवंडकर व पोना/पेडणेकर असे शासकीय वाहनाने वाडा कोनी येथील आंबा बागेमधून निघून वाडा विद्युत उपकेंद्र कार्यलयाजवळ आले. लोकसेवक पाटील यांची वँगनाआर वाहन कार्यालया बाहेर दिसल्याने मी पंच श्री.जगताप व पोकाँ/पोतनीस यांना वाहनातून खाली उतरविले व मी लोकसेवक पाटील यांची भेट घेण्यास निघून गेलो. त्यानंतर वाहनातून उतरून मी कार्यालयामध्ये गेलो असता. लोकसेवक श्री.पाटील सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, हे कार्यालयात हजर होते. त्यांच्याशी प्रथम आंब्या विषयी चर्चा करून चर्चे दरम्यान वाडेकर यांचे दहा व माझे वीस असे म्हणून मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यातून माझे उजव्या हाताने लाचेची रक्कम काढून लोकसेवक श्री.पाटील यांचे समोर धरली असता, लोकसेवक श्री.पाटील यांनी ती लाच रक्कम रूपये 30000/- आपल्या उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून घेऊन परिधान केलेल्या फुलपॅन्टच्या समोरील कडेच्या उजव्या बाजूच्या खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर

लोकसेवक श्री.पाटील यांचेशी विद्युत व्होल्टेज बाबत चर्चा करून कार्यालयाबाहेर येऊन माझे डोक्यावरील टोपी काढून केसातून हात फिरवून लोकसेवक श्री.पाटील यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता. पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, व सापळा पथकाने लोकसेवक श्री.पाटील यांना लाच रक्कम रुपये 30000/- स्विकारले स्थितीत 19.46 वाजता रंगेहाथ पकडले. दि. 06/04/2023 रोजीच्या सापळा मुख्य पंचनामा कारवाईच्या अनुषंगाने 14.30 ते दि. 07/04/2023 रोजी 04.30 वा.चे मुदतीत पोलीस उपअधिक्षक श्री.कांबळे, यांनी पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा केलेला आहे. अशा रितीने लोकसेवक श्री. अमित आप्पासाहेब पाटील वय-43 वर्षे, सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जिल्हा- सिंधुदुर्ग राहणार कोल्हापूर यांनी माझे वडील पद्माकर गोगटे व मित्र श्री. वाडेकर यांचे विद्युत कनेक्शन करीता माझ्याकडे वाडेकर यांचे प्रकरणाचे 10000/- रु. व वडीलांच्या प्रकरणाचे 20000/- असे मिळून 30000/- रुपयांची दिनांक 28/02/2023 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केली. व दिनांक 06/04/2023 रोजी महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता.देवगड, जिल्हा- सिंधुदुर्ग कार्यालयामध्ये ती लाच रक्कम रुपये 30000/- स्विकारल्याने त्यांना 19.46 वाजता ताब्यात घेतल्याने माझी त्यांचे विरुद्ध कायदेशिर तक्रार आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

nilkanth gopalkrishna bagale(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस स्टेशन ऑफिसर
देवगड पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** nilkanth gopalkrishr
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**